# तुये-पेडणे येथे २७ रोजी 'ग्रामलोक' कार्यक्रम

प्रतिनिधी
पेडणे

साहित्य अकादमी नवी दिल्लीने ग्रामपंचायत तुये व कोकणी कला माची पेडणे यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. २७ रोजी ग्रामपंचायत हॉल तुये येथे दु. ३.३० वा. 'ग्रामलोक' कार्यक्रम आयोजित केला आहे. ग्रामीण भागातील साहित्यिकांना व लोककलाकारांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने साहित्य अकादमी नवी दिल्लीतर्फे ग्रामलोक कार्यक्रमाद्वारे जनजागृती करण्यात येते.

तुये येथे होणाऱ्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान नामवंत साहित्यिक व साहित्य अकादमीच्या सर्वसाधारण मंडळाचे सदस्य डॉ. पूर्णानंद च्यारी भूषविणार आहेत. यावेळी तुयेच्या सरपंच अनिता साळगावकर, उपसरपंच मनोहर पेडणेकर तसेच कोकणी कला माची पेडणेचे अध्यक्ष प्रकाश तळवणेकर व साहित्य अकादमीच्या कोकणी सल्लागार मंडळाचे सदस्य शशिकांत पुनाजी उपस्थित असतील.

ग्रामलोक कार्यक्रमात कथाकार संतोष महाले कथाकथन, प्रा. प्रियांका परब काव्यवाचन व पेडण्यातील लोकवेदावर विवेचन करतील. अद्वैत साळगावकर निबंध सादरीकरण, सायली आजगावकर काव्यवाचन, जोंकीम फर्नांडिस साहित्य अनुभव कथन व मैथिली चारी गायन करतील.

लोकवेद दर्शनात लोककलाकार अशोक नाईक यांच्या नेतृत्वाखाली तुयेतील लोककलाकार रोमट तर काजरेश्वर महिला सेल्फ हेल्प ग्रुप तुये फुगडी सादर करतील. मांगिरीश विद्यालय आरोबाचे विद्यार्थी लोक नृत्य सादर करतील. कार्यक्रमाचे संयोजन पंचसदस्य उदय मांद्रेकर करणार आहेत. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.